तहसीलदार कार्यालय राजापूर
मेन रोड राजापूर , ता.राजापूर, जि.रत्नागिरी. ४१६७०२.
दुरध्वनी क्रमांक :- ०२३५३-२२२०२७. ईमेल आयडी:- tah_rajapur@rediffmail.com

क्र./आरटीएस/२४ x७ /कावि-९८९,९९४/२०१९ दि.२९/०६/२०१९

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी,**
**(२४ x७ कक्ष)**

**विषय:-** रत्नागिरी २४ x७ तक्रार निवारण कक्षात नोंदविलेल्या तक्रारीबाबत
**श्री. विश्वास गोरुले, रा.पाचल यांचा अर्ज**

**संदर्भ** :- २४ x७ पोर्टलवरील तक्रार क्र.१२/६/२०१९, दि.२०/०६/२०१९

**महोदय,**

श्री. विश्वास गोरुले, रा.पाचल यांनी दि.२०/०६/२०१९ रोजी आपलेकडे २४ x७ पोर्टलवर तक्रारी अर्ज केलेला आहे. सदर तक्रारी अर्जामध्ये अर्जदार यांनी "दि.३१/१०/२०१८ रोजी तहसीलदार राजापूर यांचेकडे वारस तपास करणेसाठी अर्ज दिलेला असून त्यांनी तलाठी यांचेकडे सदर अर्ज पाठविलेला असून तलाठी यांनी अद्याप वारस तपास केलेला नाही. तो होणेबाबत " असे नमूद केलेले आहे. सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने तलाठी पाचल यांजकडून चौकशी अहवाल प्राप्त करुन घेतला असता वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

तक्रार अर्जदार श्री.विश्वास गोरुले यांच्या वारस तपासासाठीच्या अर्जानुसार फेरफार क्र.२१२७ नोंदवून नमुना नं.९ ची नोटीस निर्गमित करणेत आलेली आहे. सदर नोटीसच्या अनुषंगाने श्री.सुनिल तुकाराम गोरुले हयांनी हरकत अर्ज दिलेला आहे. सबब उक्त हरकतीनुसार गाव नमुना नं.१२ ची नोटीस दि.२५/०६/२०१९ रोजी सर्व खातेदार यांना पाठविलेली असून प्रकरणाची सुनावणी दि.१७/०७/२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. मंडळ अधिकारी पाचल यांचेकडे लावणेत आलेली आहे.

वरीलप्रमाणे सदर प्रकरणी सद्यस्थिती अवलोकनार्थ सादर.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा :
आवक नं. २५४८७ २
दि. 03 JUL 2019
विशेष नोंदवही नं :-
कार्य विवरण नं. :-
प्र. लि. नि.उ. जि. जिल्हाधिकारी

आपली विश्वासू,

(श्रीम.प्रतिभा वराळे)
**तहसीलदार राजापूर**

प्रत :- मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी (कुळवहिवाट शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

D:\pooja zore\24 - 7.docx